| MHKO100015992024 | <u>नियमीत दिवाणी दावा क्र. २६५/२०२४</u><br><br>गुलाब सनदी.<br>//वि//<br>मेहराजबी सनदी वगैरे. |
| --- | --- |

## <u>निशाणी क्र. २४ खालील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी त्यांचेविरुध्द झालेला "विना कैफियत" चा आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी मिळणेकरीता दाखल केलेला आहे. वादींतर्फे प्रस्तुत अर्जाचे मागील पानावर म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रकरणाचे अवलोकन केले. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा वाटप, हक्कज्ञापन, स्वतंत्र कब्जा व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांना समन्सची बजावणी झालेली आहे. परंतु, त्यांनी मुदतीत कैफियत दाखल केलेली नाही. प्रकरणाचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना समन्सची बजावणी होऊन ते हजर झाले. परंतु, त्यांनी कैफियत दाखल न केल्यामुळे त्यांचेविरुध्द दिनांक २२/०७/२०२५ रोजी विना कैफियत आदेश पारीत करण्यात आला. प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिनांक १३/११/२०२५ रोजी दाखल केलेला आहे.

०३. प्रस्तुत अर्जात प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी असे कारण नमुद केलेले आहे की, प्रतिवादी यांना दावा मिळकती संबंधीचे जुने फेरफार व उतारे वेळेत उपलब्ध झाले नाहीत. तसेच, प्रतिवादी यांना मुदतीत आपली कैफियत व म्हणणे दाखल करावे लागते याचे कायदेशिर ज्ञान नव्हते. त्यामुळे, त्यांना मुदतीत कैफियत व म्हणणे देता आले नाही. प्रत्यक्षात सदर कारण व प्रतिवादी हजर झाल्याचा काळ विचारात घेतले असता, प्रस्तुत अर्जात प्रतिवादी यांनी दिलेले कारण संयुक्तीक नाही. परंतु, प्रस्तुत प्रकरणाचे स्वरुप पाहता प्रतिवादींची प्रस्तुत दाव्याकामी कैफियत व म्हणणे अभिलेखावर येणे दाव्याच्या गुणदोषावर निकालासाठी आवश्यक आहे. सबब, नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करता प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचा प्रस्तुतचा अर्ज प्रत्येकी रक्कम रु.२००/- अशी एकुण रक्कम रु.८००/- च्या खर्चासह मंजुर करणे योग्य होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## -: आदेश :-

०१. अर्ज रक्कम रु.८००/- (रुपये आठशे फक्त) च्या खर्चासह मंजुर करण्यात येतो.

०२. खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी पुढील तारखेपर्यंत वादी यांना अदा करावी.

०३. खर्चाची रक्कम वादी यांना दिल्यानंतर प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना त्यांची कैफियत सादर करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला).

Digitally signed by SACHIN DURGASHANKAR MEHTA
Date: 2026.01.20 18:09:21 +0530

**( एस. डी. मेहता )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः २०/०१/२०२६.